## संपादकीय

# उद्योगरत्न रतन टाटा

महाराष्ट्र सरकारचा पहिला-वहिला उद्योगरत्न पुरस्कार टाटा उद्योग समूहाचे अध्वर्यू राहिलेले रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला. टाटांचे वय लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी घरी जाऊन टाटांना हा पुरस्कार दिला. त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड योग्य नाही, असे कुणीही म्हणणार नाही. रतन टाटा या नावामागेच भारतीय उद्योगजगताचे सारे सर्वस्व साम ावलेले आहे. रतन टाटा यांनी १९९१ साली तत्कालीन टाटा उद्योग समूहाचे प्रमुख जेआरडी टाटा यांच्याकडून उद्योगाचे प्रमुखपद स्वीकारले. ते जेव्हा या पदावर होते तेव्हा टाटा उद्योग समूहाचे उत्पन्न पन्नास पटींनी वाढवूनच टाटांनी दुसऱ्याच्या हाती पद सोपवले.टाटा उद्योग समूह म्हणजे निव्वळ उद्योग समूह नाही तर त्यामागे संस्कृती, कामगार वर्गाची प्रतिष्ठा आणि कामगारांचा मालकावर असलेला विश्वास ही सारी परंपरा येते, याचे भान रतन टाटांना नेहमीच राहिले. त्यामुळे त्यांच्या काळात आणि पूर्वीही टाटांनी औद्योगिक नितीमत्ता जपली आणि तिचाच कायम पाठपुरावा केला. रतन टाटा याच्या उद्योगाप्रती असलेल्या निष्ठेचे एकच उदाहरण पुरेसे आहे. टाटा यांच्या ताजम हाल पॅलेस हॉटेलवर जेव्हा अतिरेकी हल्ला झाला तेव्हा टाटा स्वतः हॉटेलमध्ये यायला निघाले होते. कारण तेथे एकही टेलिफोन ऑपरेटर जागेवर हजर नव्हता. जेआरडी टाटा यांनी अत्यंत मेहनतीने विमान कंपनी सुरू केली आणि तिचे नाव होते एअर इंडिया. ही कंपनी आजही लोकप्रियतेच्या बाबतीत शिखरावर आहे. जरी ती आज कर्जबाजारी झाली असली तरीही तिच्या महाराजाला कुणीही विसरणार नाही. साम्यवादाच्या बिनडोक तत्त्वज्ञानाकडे आकर्षिले गेलेले पंडित नेहरूंनी त्यांच्या मंत्रिमंडळात असलेले एक मंत्री रफी अहमद किडवाई यांच्या बिनडोक आग्रहामुळे ही कंपनी सरकारच्या घशात घातली. उद्योग सरकारला चालवायची अक्कल नाही.

# फर्दापूर येथील बँक ऑफ महाराष्ट्राचे सर्व्हर, नेट, गेल्या अनेक दिवसांपासून बंद

## खातेदार महिलांची व नागरिकांची होते प्रचंड गैरसोय

फर्दापूर ( प्रतिनिधी) - सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील बँक ऑफ महाराष्ट्राचे सर्व्हर व नेट गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्याने खातेदार महिला व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. फर्दापूर येथे बँक महाराष्ट्रची ही सर्वात मोठी शाखा आहे. या शाखेला ठाणा, धनवट, वरखेडी खुर्द, वरखेडी बु.लेणापूर, सावरखेडा, फर्दापूर तांडा, जंगला तांडा, जंगलागांव, पळसखेडा, जामठी, रवळा, जवळा, पिंपळा अशा एकुण १४ गावांचा समावेश आहे. या गावांच्या खातेदार महिलांना, ग्राहकांना मात्र गेल्या अनेक दिवसांपासून येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे सर्व्हर बंद असल्यामुळे मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या बँकेचे सर्व्हर कधी बंद तर कधी चालू असते . सर्व्हर अनेक दिवसांपासून बंद होत असल्यामुळे सर्व व्यवहार ठप्प पडल्याने ग्राहक संतप्त होत आहेत. सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली व त्या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा१५०० पंधराशे रुपये सरकार त्यांच्या खात्यावर जमा करत आहे काढण्यासाठी महिला उपाशी, तापाशी,अनवाणी पायाने बँकेत चकरा मारत आहे.



गेल्या दोन महिन्यापासून बंद असल्यामुळे ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही महिला जर बँक पासबुक खाते घेऊन पैसे चेक करण्यासाठी व पासबुक इंट्री, केवायसी, आधार खाते लिंक करण्यासाठी येतात तर यांना बॅंकेतील काही कर्मचारी अधिकारी व शिपाई, हे व्यवस्थित बोलत नाही.ही वस्तुस्थिती आहे. अशा पद्धतीने बँकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे वागणं असेल तर सामान्य नागरिकांनी कुणाकडे न्याय मागवा हा प्रश्न उपस्थित होत आहे.

# संस्कार प्राथमिक विद्यालयात चित्रकला स्पर्धा उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर ( प्रतिनिधी)** - संस्कार प्राथमिक विद्यालय जाधववाडी, औरगाबाद. या प्रशालेत संस्थचे अध्यक्ष जगदिश देसले, सचिव लीना देसले यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रशालेत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. यावेळी आयोजित चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी प्रमुख पाहुणे यांनी म हात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जीवनाविषयी व चित्रकला विषयाचा शैक्षणिक क्षेत्रात असलेले स्थान या विषयी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक सतिष तायडे, सुषमा जोशी, जावेद पठाण, विसपूते मनिषा, पयवेक्षक सुरेखा पाटील हे उपस्थित होते. कार्यकमाचे सुत्रसंचालन व आभार ललिता जोशी यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, जिल्ह्यातील १ हजार ९५३ लाभार्थ्यांना मंजुरी



सिल्लोड ( प्रतिनिधी ) -, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १ हजार ९५३ वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास शासनाकडून कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करण्यात आला आहे. याबाबत राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत दि.८ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यासाठी पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता. या योजनेत सिल्लोड सोयगाव तालुक्यातील २८८ लाभार्थ्यांचा समावेश आहे.

शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग मार्फत भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर सम ाजासाठी घरे बांधण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून दिला जातो. ही योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येते. पदसिद्ध अध्यक्ष पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक दि.७ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडली. या बैठकीत १ हजार ९५३ वैयक्तिक लाभार्थ्यांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेअंतर्गत २०२४ - २५ करीता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १ हजार ९५३ लाभार्थ्यांकरिता रुपये १ लाख २० हजार याप्रमाणे २३ कोटी त्रेचाळीस लाख ६० हजार रुपये व ४ टक्के प्रशासकीय निधी ४ हजार ८०० प्रमाणे ९३ लाख ७४ हजार ४०० अशा एकूण २४ कोटी ७३ लाख ३४ हजार इतक्या निधीस मान्यता देण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत सिल्लोड तालुक्यातील भराडी, घाटनांद्रा, उंडणगाव, चारणेर, चारणेर वाडी, टाकली खुर्द, टाकळी जीवरग, तलवाडा, धावडा, चिंचवण, निल्लोड , पळशी, पालोद, पिंपळगाव पेठ, बोरगाव कासारी, बोरगाव सारवणी, मंगरुळ, लिहा खेडी, शिंदेफळ, सारोळा, सिरसाळा, सिसारखेडा, हट्टी, मोहळ, घटांब्री इत्यादी गावातील लाभार्थी आहेत.

# कन्नड मतदारसंघ महायुतीत भाजपाला सोडावा - राजेंद्र गव्हाणे



कन्नड (प्रतिनिधी) - कन्नड मतदार संघाची जागा महायुतीत भाजपला सोडा अशी मागणी राजेंद्र गव्हाणे यांनी भाजपाच्या राष्ट्रीय नेत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा विजय संकल्प मेळावा दादर वसंतस्मृती कार्यालय म ुंबई येथे संपन्न झाला याप्रसंगी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे मार्गदर्शक लोकनेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश अध्यक्षअध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव कांबळे यांच्या उपस्थित होते याप्रसंगी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश कोषाध्यक्ष व कन्नड तालुका खादी ग्रामोद्योग मंडळाचे चेअरमन राजेंद्र गव्हाणे यांनी कन्नड सोयगाव विधानसभा महायुतीत कन्नड ची जागा भाजपाला सोडण्याची निवेदन विनंती केली आहे तालुक्यातील विकासाच्या अनुशेष भरून काढण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेचे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव मार्गास ऑटम घाट तील बोगद्यासाठी केंद्र शासनाने ५० टक्के देऊन मंजुरी दिली आहे पुढील काम जलद गतीने होण्यासाठी भाजपाचा आमदार असणे गरजेचे आहे कन्नड तालुक्यातील भाजपाचा सक्रिय जुना संघ विचाराचा भूमिपुत्रांना (कार्यकर्ता) उमेदवारी द्यावी असे निवेदन विनंती ✻केंद्रीय गृहमंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते अमित शहा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेख बावनकुळे यांच्याकडे एका निवेदानेद्वारे मागितली.

# पिंपळदरी,हळदा परिसरात पावसाने मक्का, सोयाबीन कापसाचे मोठे नुकसान

. पिंपळदरी ( प्रतिनिधी) - सिल्लोड तालुक्यातील पिंपळदरी, हळदा सहपरिसरात बुधवारी झालेल्या परतीच्या पावसाने सोयाबीन, मक्का, कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अजिंठा, अनाड, , मुखपाट, सिद्धेश्वर नगर सराटी, बोदवड, खंडाळा डकला पिंपळदरी जळकी वसई सावरखेडा लेनापुर आदी परिसरात संध्या सोयाबीन पिकांची सोंगणी सुरु असताना बुधवारी सायंकाळी पावसाने मेघा गर्जना सह जोरदार पावसाचे हजेरी लावली .या पावसामुळे सोयाबीन मका पावसात भिजली असून परिसरात परतीच्या पावसाची संकटाची मालिका सुरु असलेल्या शेतकऱ्यांची धावपळ होत आहे.




पावसामुळे जनावरांच्या चाऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. कापलेले सोयाबीन भिजू नये यासाठी ते झाकण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु आहे.

# वडोद चाथा येथे उद्या ज्ञानेश्वर माऊली महाराज पठाडे यांचे किर्तन



सिल्लोड (प्रतिनीधी)-✻ सिल्लोड तालुक्यातील वडोद चाथा येथे नवरात्र उत्सवानिमित्त जगदंबा माता संस्थान वडोद चाथा येथे राष्ट्रीय किर्तनकार हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज पठाडे यांच्या काल्याच्या किर्तनाचा कार्यक्रम शनिवारी आयोजित करण्यात आला आहे.या किर्तनाचे सौजन्य काकासाहेब किसन चाथे हे आहेत.नवरात्र उत्सवानिमित्त वडोद चाथा येथे संगीतमय शिवमहापुरान कथा व किर्तन म होत्सवाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.मंदीर परिसरात नवरात्र उत्सवानिमित्त विद्युत रोषणाई करण्यात आली आहेत,तसेच दररोज मंदीर परिसरात परिसरातील भाविक भक्त गर्दी करत आहेत.


## तुकोबांची शब्दरत्ने- १७३६



**पर्जन्याचे काळीं वोहळाचे नद**
**ओसरतां बुंद न थारेचि -१**

पात्रता नसतानाही आपण पात्र आहोत, असे भासविणाऱ्यांची संख्या खूप आहे. याउलट पात्र असूनही आपण पात्र आहोत, असे तोंडाने न सांगता प्रत्याक्ष कृतीतून दाखवून देणारे फार कमी लोक आहेत. पात्र लोकांना फुशारक्या माराव्या वाटत नाहीत. पण अपात्रांना फुशारकीशिवाय जमत नाही. मी असा आहे, मी तसा आहे, मी असे करीन, मी तसे करीन,मी असे केले, मी तसे केले असे व्यर्थ वाचाळ बडबड करणारे लोक प्रत्याक्ष कृतीच्या वेळी कोठे गायब होतात हे कळतही नाही. आपल्या अवती भोवती आपली स्त्तुाी करणारे चार लोक जमा करून इतरांपुढे मोठेपण दाखविले जाते. पण प्रत्याक्ष कृतीची वेळ येते तेव्हा भोवतीचे चार लोक व फुशारकी मारणाराही तेथून पळ काढतो. पावसाच्यावेळी वोहळालाही नदीचे स्वरुप येते आणि पाऊस थांबला म्हणजेच पावसाळा संपला असता अशा ओहळात एक थेंबही राहात नाही. त्याप्रमाणे फुशारक्या मारणारे लोक, त्याांच्या अवती भोवतीचे त्यांचे भाट पाहून बडबडत जातात आणि कृतीच्या वेळी भाटासह हे लोक काढता पाय घेतात. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, पर्जन्याचे काळी वोहळाचे नद। ओसरतां बुंद न थारेचि ।।.

''जय जय राम कृष्ण हरी''



**डॉ. विजयकुमार पं.फड**
श्री माउलीनगर जालना,
भ्रमनध्वनी: 9422216448

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आज पालकमंत्री सत्तार यांच्या हस्ते भुमीपुजन

सोयगाव ( प्रतिनिधी ) - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे शुक्रवार ( दि.११ ) ऑक्टोंबर रोजी सोयगाव येथे पालकमंत्री तथा पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते भुमीपुजन होणार आहे. सोयगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीची शहरातील शिवप्रेम ींची मागणी होती. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी पाठपुरावा करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीसाठी मंजुरी मिळवून दिल्याने शिवप्रेमींनी ना. अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहे. कार्यक्रमास शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे, नगराध्यक्षा आशाबाई तडवी, तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण, शहरप्रमुख संतोष बोडखे, गटनेते अक्षय काळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पालकमंत्री यांच्या पुढाकाराने २१४ किमी रस्त्याची सुधारणा करण्यासाठी ३४० कोटी रुपयांचा निधी मंजूर



सिल्लोड ( प्रतिनिधी )-, सिल्लोड तालुक्यातील आमठाणा उंडणगाव, गोळेगाव पानवदोड या २१४ किमी रस्त्याची सुधारणा करण्यासाठी पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने ३४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आज शुक्रवार दि.११ रोजी सकाळी १० वाजता आम ठाणा तालुका सिल्लोड येथे या कामाचे भूमिपूजन राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्याहस्ते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दुरदृश्यप्रणालीने संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. सिल्लोड तालूक्यातील सर्वात मोठा व अनेक गावांना जोडणारा हा रस्ता मोठा होणार असल्याने व सदर गावांना दळणवळणाच्या सुविधा मोठ्याप्रमाणात उपलब्ध होणार असल्याने येथील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे


**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** औरंगाबाद

L&T Finance

## गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 08.10.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) अनिल अंबादास पाटील 2) वनिता सुनील पाटील 3) सुनील अंबादास पाटील 4) अंबादास आबाजी मानकापे 5) सुनंदा अनिल पाटील | **परिशिष्ट - I** मालमत्तेच्या पत्त्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: प्लॉट क्र. 33, शिव ज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था लि. एन-6, सिडको औरंगाबाद महाराष्ट्र 431003 प्लॉट क्षेत्रफळ 252.00 चौ. मी. येथे स्थित. सीमा: पूर्व - प्लॉट क्र. 34; पश्चिम - प्लॉट क्र. 32; उत्तर - सोसायटी अंतर्गत रस्ता; दक्षिण - प्लॉट क्र. 30 | AURHL1900 0094 | 20.08.2024 | रु. 16,18,032/- | रु. 12,272,133.44/- | रु. 1,61,80,322/- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 या वेळेत पूर्व भेटीसह. | 05.11.2024 सकाळी 10 पासून ते दुपारी 12. |

### सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **04/11/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **05/11/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **06/11/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा. **नाव - शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, एल&टी फायनान्स लिमिटेड, 1 ला मजला, रत्नप्रभा कॉम्प्लेक्स, जालना रोड, औरंगाबाद - 431001 आणि संतोशी संपर्क. नं.9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 11.10.2024
**ठिकाण:** औरंगाबाद

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड



Printed at Anand nagari prakashan pvt. ltd. A/14, additional M.I.D.C., Jalna & published by Ravindra Mishrilal Bangad on behalf of Anand nagari prakashan pvt. ltd. at Jyotimarya Complex, Block no. 5 & 32 Jalna road, Aurangabad (Maharashtra). Tel.: (0240) 2483911, Fax: 2481910, Editor: Ravindra Mishrilal Bangad*. (*Responsible for selection of news under P & RB act.). Jalna 13th year. E-mail: anandnagri@gmail.com. (All desputes under Jalna jurisdiction). It is not necessary to the editorial board that they agree with the opinions expressed through matter and articles published in this newspaper. RNI no. MAHMAR/2012/26780.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक आणि संपादक रवींद्र मिश्रीलाल बांगड* यांनी आनंद नगरी प्रकाशन प्रा.लि. ए/१४, अॅडिशनल एम.आय.डी.सी., जालना येथे छापून कार्यालय ज्योतिर्मय कॉम्प्लेक्स गाळा क्रं. ५ व ३२ जालना रोड औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. फोन नं. ०२४०-२४८१८०९, २४८३९११ फॅक्स २४८१९१० औरंगाबाद वर्ष १३वे. (* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे). ई मेल : anandnagri@gmail.com (सर्व वाद जालना न्यायालयाअंतर्गत) या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकूर व लेख या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. आरएनआय नं.एमएएचएमएआर/२०१२/२६७८०